**आर सी सी क्र. २५०/२०१५**
**नि. १०८**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५**
मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | वामन कुंडलिक खेडकर |
| वय | - | ६२ वर्षे |
| कामधंदा | - | सेवानिवृत्त सहा. फौजदार |
| राहणार | - | **अहमदनगर** |

<u>सरतपास सरकारी वकिल श्री एस. एस. दराडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>

१. दि. १४.६.२०१५ रोजी बोधेगाव दूरक्षेत्रावर पो हे कॉ या पदावर मी शेवगाव पोलीस स्टेशन येथे नेमणूकीस होतो. त्यादिवशी मी ज्योतीराम जगन्नाथ शेळके याचा जबाब सिवील हॉस्पीटल अहमदनगर येथून शेवगाव पोलीस स्टेशन येथे आला आणि तयांनी माझ्याकडे दिला. ते माझ्याकडे आल्यावर मी त्याचे अवलोकन केले आणि गुन्हा दाखल करुन तपास माझ्याकडे वर्ग केला. त्यानंतर दूस-या दिवशी घटनाठिकाणचा पंचनामा केला. आता साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात येते. ते तेच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यात लिहिलेला मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. १०९ देण्यात येते. त्यानंतर आरोपीचा शोध घेउन आरोपींना अटक केले आणि त्यांना न्यायालयात हजर केले. त्यानंतर साक्षीदार तपासले आणि त्यांचे जबाब दोषारोपपत्रात समाविष्ट केले. आरोपीविरुध्द भरपूर पुरावा मिळून आल्यामूळे आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले. आरोपींना पाहिल्यास मी त्यांना ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास संपला

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. एल एच लांडे यांच्यामार्फत</u>

२. हे म्हणणे खरे नाही की मी घटनाठिकाणी गेलो नाही व घटनाठिकाणचा पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पंचांसमक्ष पंचनामा केला नाही आणि त्यावर त्यांच्या सहया घेतल्या नाहीत. घटना नेमकी कोणत्या तारखेला घडली हे मी फाईल पाहून सांगू शकतो. मी एन सी तक्रार क्र ३२४/२०१५ दि.१७.०५.२०१५ रोजीच्या एनसी चे अवलोकन केले होते. आरोपीतर्फे विधीज्ञांनी सदर एनसी तक्रार सा क्र ५ यांना उलटतपासात रेफर केल्यामूळे त्यास नि.११० देण्यात येते.

प्रश्न दि. १७.५.२०१५ रोजीच्या एनसी चा तुम्ही तपास केला नाही ?

उत्तर एनसी तक्रारीचे तपास होत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की या एन तक्रारीवर भा द वि. कलम ३२५ नमूद केलेले आहे. साक्षीदार

स्वतःहून सांगतात की एन सी तक्रार एनसी रजिस्टरला नोंदवल्यानंतर गुन्हा दाखल झाल्यास त्या एनसी तक्रारीवर माहितीस्तव कलम लिहिले जातात.

प्रश्न सदर घटनेची फिर्याद दाखल करण्यासाठी एक महिन्याचा विलंब का झाला याची आपण चौकशी केली का ?

उत्तर जबाब आणि सर्टिफिकेट टपालाने येण्यास विलंब झाल्याने उशीर झाला.

४. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष कोणत्याही साक्षीदाराने आरोपीविरुध्द जबाब नोंदवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की दोषारोपपत्रात घटना ठिकाणचा उतारा जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की पुरावा नसताना चूकीच्या दिशेने तपास करुन आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे.

उलटतपास संपला

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

**sd/-**

दि. २२.०८.२०२४

(श्रीमती एस यू जागुष्टे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
शेवगाव